**रे.दि.मु.नं.३७/२०१८**
**नि.क्र.६० लगत**

**<u>वादीचा उर्वरीत उलटतपास प्रतिवादींतर्फे वकील श्री. व्ही. व्ही. पावसकर यांचेकडुन शपथेवर सुरू</u> -**

**३७.** हे म्हणणे खरे आहे की, शिपींग कंपनीमध्ये काम करीत असताना मला नेस्ट ऑफ किन (नॉमिनी) चे ॲफिडेव्हीट दयावे लागते. हे मला आठवत नाही की मी ए. एस. पी. कंपनीमध्ये काम करीत असताना नेस्ट ऑफ किन या ॲफिडेव्हीटमध्ये माझ्या पत्नी आणि मुलाचे नाव नमुद करून दिले होते. माझा विवाह १४/०२/१९९६ रोजी झाला. हे म्हणणे खरे आहे की, माझा अदयाप घटस्फोट झालेला नाही.

**३८.** हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आजी सासूकडून मृत्युपत्राने मला मिळालेल्या मिळकतीसंदर्भात हा दावा दाखल केलेला आहे.

**३९.** **प्रश्न -** तुम्ही दावा मिळकतीचे मुळ मालक नाहीत?

**उत्तर -** मी मृत्युपत्राने मालक झालेलो आहे.

**४०.** हे म्हणणे खरे नाही की, या मिळकतीचे मुळ मालक निता शेवडे आहेत. माझ्याकडे मृत्यूपत्राची मुळ प्रत नाही साक्षीदार स्वत:हून सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यामध्ये याबाबत स्पष्ट उल्लेख नाही. साक्षीदार सांगतो की, माझी पत्नी सोडून जातेवेळी ती मृत्यूपत्राची मुळ प्रत तिच्यासोबत घेवून गेली. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या दाव्यामध्ये असा उल्लेख नाही.

**४१.** हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या पत्नीने तिच्यासोबत मृत्युपत्राची मुळ प्रत घेवून गेल्याबाबत पोलीसांकडे तक्रार दिली नाही. अन्य कागदपत्रे जसे की,

पॅनकार्ड  आधारकार्ड, बँकेचे कागदपत्रे, शिपींग कंपनीचे कागदपत्रे इत्यादी माझी पत्नी तिच्यासोबत घेवून गेल्याबाबत मी पोलीसांकडे तक्रार केली नाही, हे म्हणणे खरे आहे. माझ्या आजीसासूकडून मृत्युपत्राअन्वये दावा मिळकत मला मिळाल्याचे मला माझ्या सास-यांकडून मी बोटीवरून परत आल्यानंतर समजले. मी ते मृत्युपत्र वाचलेले आहे.

**४२.** **(प्रतिवादीतर्फे विधीज्ञांनी वादीतर्फे दाखल कागदयादी नि. ३९/१ येथील सुशिला मुळ्ये यांनी वादीच्या नावे लिहून दिलेल्या मृत्यूपत्राच्या छायांकित प्रतिवर काही प्रश्न विचारले).**

**४३.** **दि.**१४/०२/२००८ रोजी मी भारतात होतो. हे म्हणणे खरे आहे की, सुशिला मुळ्ये यांचे वय २००८ साली वय वर्षे ९२ होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या अंथरूणाला खिळून होत्या. हे म्हणणे खरे आहे की, मृत्युपत्र १४/०२/२००८ चे आहे. हे म्हणणे खरे आहे की, मृत्युपत्रासोबत असलेल्या वैदयकीय प्रमाणपत्रावर दि.०८/०३/२००८ अशी तारीख आहे. हे मृत्युपत्र नोटरी केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. नोटरी १४/०३/२००८ रोजी केल्याचे दिसून येते. सदर मृत्युपत्राच्या छायांकित प्रतिला **निशाण ११५** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, मृत्युपत्राची तारीख, नोटरी केल्याची तारीख आणि वैदयकीय प्रमाणपत्रावरची तारीख वेगवेगळी आहे.

**४४.** हे म्हणणे खरे आहे की, सुशिला मुळ्ये यांच्या पश्चात त्यांची एक हयात मुलगी, एक मयत मुलगी आणि नातवंडे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मुळ्ये यांना एक नातू आहे व एक नातू मयत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी या मृत्युपत्राच्या छायांकित प्रतिच्या आधारेच माझे नाव तलाठी कार्यालयात रेकॉर्डवर लावून घेतले. हे म्हणणे खरे नाही की, जावई असल्याने घर दुरूस्ती इत्यादी कारणासाठी केवळ हे

मृत्युपत्र माझ्या नावे करण्यात आले होते.

**४५.** हे म्हणणे खरे नाही की, दावा दाखल करण्याचाच मला अधिकार नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, बोगस कागदपत्रांच्या आधारे मी हा खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीशी माझा कोणताही हक्कसबंध नव्हता व नाही. हे म्हणणे खरे नाही की, हा दावा खोटा आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

**सही/-**
**(श्रुती ह.पाटील)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर**
**देवरुख**

**दि. ०९/१०/२०२४**